अत्यंत तातडीचे

# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.नि.वि.वि/३२१/२४/२०१३,

परिपत्रक :-

१) विद्यापीठाचे संचालक व विभागप्रमुख,

२) प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये (पांरपारिक महाविद्यालये)

विषय-: राज्य शिक्षक पुरस्कार २०१३-२०१४ करिता विद्यापीठ / महाविद्यालयीन शिक्षकांची शिफारस करणेबाबत.

संदर्भ :- शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क. राशिपु/२०१४/ प्र-शा-३/ ५०४५ दि. ३ ऑगस्ट २०१३

महोदय/महोदया,

आपणांस विदीत आहे की, विद्यापीठीय / महाविद्यालयीन स्तरावर आदर्श शिक्षकांचा शोध घेऊन शासनातर्फे प्रस्तावित राज्य शिक्षक पुरस्कार सन २०१३-१४ करिता निवड प्रक्रियेद्वारे विद्यापीठातर्फे आदर्श शिक्षकांची शिफारस केली जाणार आहे.

महाराष्ट्र शासनातर्फे २०१३-२०१४ करिता विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावर शिक्षकांना त्यांच्या अंगीकृत कार्यास प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या गुणांचा यथोचित सन्मान व्हावा करिता शासन निर्णयान्वये "राज्य शिक्षक पुरस्कार" प्रदान करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी विद्यापीठ स्तरावर निवड समिती नेमण्यात येणार आहे. आपल्या अधिपत्याखालील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील महाविद्यालयांतील तसेच विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील शासकीय महाविद्यालये अध्यापक महाविद्यालये आणि शासकीय शिक्षण संस्थेतील शिक्षक म्हणून ज्यांची किमान १५ वर्षे सेवा झालेली आहे, ज्यांनी विशेष गुणवत्ता व अर्हता धारण केली आहे अशा किमान एक किंवा दोन पात्र शिक्षकांचे प्रस्ताव विद्यापीठाला सादर करावेत.

**तसेच ज्या शिक्षकांची शिफारस करावयाची, त्यांची माहिती अ,ब,क,ड,ई, व फ हया विवरण पत्रात (संबधीत शिक्षकांनी १० ते १५ ओळीत संक्षिप्त माहिती/त्यांचा दुरध्वनी कमांक, विद्यापीठ विभाग/महाविद्यालयाचा दुरध्वनी कमांक व घरचा पूर्ण पत्ता) आणि दोन पासपोर्ट आकाराचे कृष्णधवल छायाचित्र, विद्यापीठ मान्यता प्रत्राची प्रत, ५ प्रतीत प्रस्ताव तसेच प्रस्तावात त्यांनतरची पृष्ठे शिक्षकांनी प्राथमिक अटी पूर्ण केल्याची प्रमाणपत्रासह कमवार कागदपत्रे जोडावीत. प्रस्तावातील त्यानंतरची पृष्ठे कमवार निर्देशित करावे. प्रस्तावाची प्लॉपी (आय.एस.एम.विंडो ९८) तसेच शिक्षकाबाबतचा पोलिस अहवाल अन्य सर्व कागद पत्रांच्या सत्य प्रती प्रस्तावासोबत पाठविणे आवश्यक आहे.**

या परिपत्रकासोबत सहा विवरण पत्रे व शिक्षकांची निवड करण्यासाठी लागू करावयाचे शासन निर्धारीत निकषांची प्रत जोडलेली आहे. पैकी (ब) हे विवरण पत्र आपण निश्चित केलेल्या पात्र शिक्षकांच्या नावाने त्यांच्या स्वाक्षरीनिशी भरुन घ्यावे, तसेच प्रपत्र (अ),(ब),(क),(ड),(इ), व (फ) ही सर्व विवरण पत्रे इ. **विद्यापीठ वेबसाईट www.mu.ac.in वरून डाऊनलोड करून** त्यातील सर्व रकाने मराठी मध्ये भरुन आपण शिफारस करुन (२००८ ते २०१३) या **पाच वर्षाच्या** गोपनीय अहवालासह ५ प्रतीत संचालक महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, मुंबई विद्यापीठ, मुख्य इमारत, मुंबई ४०० ०३२, यांचेकडे **दिनांक १८ ऑक्टोबर, २०१३** पर्यंत पाठवून देण्याची व्यवस्था करावी.

...2/-

कृपया आपण हे परिपत्रक सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावे व १८ ऑक्टोबर, २०१३ पर्यंत विहित गुणवत्ता व अर्हताधारक धारण करणा-या शिक्षकांचे प्रस्ताव विद्यापीठाला प्राप्त होतील असे पहावे. तसेच १८ ऑक्टोबर, २०१३ नंतर अर्जाचा स्विकार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

टिप्पणी :-

१) पाच वर्षाचा गोपनीय अहवाल (C.R.)
२) पोलिस अहवाल,
३) संबधित शिक्षकाविरूध्द महाविद्यालयीन व अन्यप्रकारची अशी कोणतीही चौकशी किंवा न्यायालयीन चौकशी असल्यास त्या बद्दलचा सविस्तर अहवाल.
४) शिक्षकाने त्याच्या विषयात शोध निंबधक प्रकाशित केलेले असावेत.
५) विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्या विकासाकरिता राबविलेले उपकम
६) शिक्षकाने गेल्या पाच वर्षात शिकविलेल्या प्रत्येक विषयातील किमान ५० टक्के विद्यार्थ्यांनी ६० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले असावेत. त्यातील १० टक्के विद्यार्थ्यांनी ८० टक्के गुण प्राप्त केलेले असावेत.
७) पी.एच.डी. किंवा नेट-सेट उत्तीर्ण झालेले असल्यास,
८) किमान २ विद्यार्थ्यांना पी.एच.डी. मार्गदर्शक म्हणून काम केलेले असावे.
९) शिक्षकाने त्याच्या अद्यापनक्षेत्रातामध्ये केलेले संशोधनपर कार्य शोधनिबंध व त्याची प्रसिध्दी.
१०) आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय सेमिनारमध्ये सादर केलेले संशोधनपर कार्य.

टिप्पणी :- कृपया संबधित कागदपत्रे जोडावित तसेच सादर केलेली माहितीचे पृष्ठ कमांक निर्देशित करावे.

विशेष सुचना:-

अ. विद्यापीठातील विभाग प्रमुख व संचालक यांनी आपला प्रस्ताव मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांचे मार्फत सादर करावा तसेच

ब. शासन मान्य प्राचार्य यांनी आपला प्रस्ताव मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे, यांचे मार्फत सादर करावा तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी आपला प्रस्ताव संस्था चालक यांचे मार्फत सादर करावा.

मुंबई - ४०० ०३२
दिनांक - ३ ऑक्टोबर २०१३

प्राचार्य. (डॉ.) राजपाल श्री. हांडे
संचालक
(महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ)

प्रति:-

१) विद्यापीठाचे संचालक व विभागप्रमुख,
२) प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान पांरपारिक महाविद्यालये, यांचे माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरिता रवाना.

प्रपत्र 'अ'

२०१३-२०१४ या वर्षासाठी महाविद्यालयातील / विद्यापीठातील
प्रशंसनीय शिक्षकांना राज्य पुरस्कार

| | |
|---|---|
| १) शिक्षकांचे नाव | |
| २) महाविद्यालयाचे/विद्यापीठाचे (विभाग)नांव | |
| ३) धारण केलेले पद | |
| ४) अध्यापनाचा अनुभव (वर्षाची संख्या) | |
| ५) पुढील माहिती आवर्जून द्यावी | |
| १) शिकवण्या घेतात का? | |
| २) राजकीय/श्रमिक संघाच्या (ट्रेड युनियन) कार्यामध्ये भाग घेतात काय? | |
| ३) त्यांना तक्रार करण्याची व न्यायालयाकडे धाव घेण्याची सवय आहे काय? | |
| ४) ते वक्तशीर आहेत काय? | |
| टीप -शिफारशी पक्क्या करतांना वरील माहितीस ७५ टक्के महत्व देण्यात यावे. | |
| ६) शिक्षकाने त्यांच्या/तीच्या शिकवण्याचा प्रभाव पाडण्यासाठी कोणताही नाविन्यपुर्ण प्रयोग केला आहे काय ? संक्षिप्त टीप द्यावी. | |
| ७) वर्ग शिक्षण अधिक रोचक बनविण्यासाठी शिक्षकाने लोकमाध्यमासह (मास मिडीया) कोणत्या प्रकारची शिक्षण साधने वापरली आहेत. | |
| ८) शिक्षक बुध्दीवान व कमकुवत विद्यार्थ्यांकडे खास लक्ष पुरवुन त्यांना मदत करतो काय? असल्यास तपशील द्यावा. | |
| ९) शिक्षकाला गेल्या दहा वर्षामध्यें शाळेकडुन, समाजाकडुन, शासनाकडुन कोणतीही मान्यता पुरस्कार व बक्षिसे मिळाली आहेत काय? असल्यास तपशील द्यावा. | |

ठिकाण

दिनांक

स्वाक्षरी
कुलसचिव /
विद्यापीठाचे संचालक/विभाग प्रमुख
प्राचार्य संलग्नित महाविद्यालय

प्रपत्र 'ब'

२०१३- २०१४ या वर्षासाठी महाविद्यालयातील /विद्यापीठातील प्रशंनीय शिक्षकांना राज्य शिक्षक पुरस्कार विद्यापीठाने /महाविद्यालयाने शिफारस केलेल्या शिक्षकांने द्यावयाचा व्यक्तिगत तपशील.

१) शिक्षकांचे सपूर्ण नाव :
२) विद्यापीठ / महाविद्यालय :
३) पदनाम :
४) जिल्हा :
५) जन्म दिनांक :
६) वडिलांचे नाव :
७) कायमचा पत्ता व दुरध्वनी :
८) शैक्षणिक अर्हता (मिळालेल्या) :
९) नोकरीचा अभिलेख :
१०) व्यवसायिक संघटनेचे सदस्य व त्या संघटनेमधील सहभाग :
११) संशोधन कार्याचा तपशील :
१२) महात्वाच्या प्रकाशनांचा तपशील :

| | प्रकाशनाचे नाव | प्रकाशक | प्रकाशक वर्ष | पाठयपुस्तक म्हणूनविहीत केलेआहे काय? | पज्यासाठी विहित केले ती परिक्षा किंवा वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | | |

१३) विदेशातील प्रवासाचा तपशील देश, कालावधी व भेटीचे प्रयोजन :
१४) वर समाविष्ट नसलेली कोणतीही विशेष अर्हता व कामगिरी

ठिकाण :
दिनांक :

शिक्षकांची स्वाक्षरी

प्रपत्र 'क'

प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की, ..........................................................................
आडनाव प्रारंभ करून संपूर्ण नाव)

पदनाम प्राध्यापक / प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुख. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . यांचा गतइतिहास निष्कलंक असून, त्यांचे पूर्वचारित्र्य निर्दोष आहे.

त्यांच्या विरुध्द विभागीय व अन्यप्रकारची अशी कोणतीही चौकशी किंवा न्यायालयीन कार्यवाही चालू नाही.

ठिकाण :

दिनांक :

**स्वाक्षरी**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे,
कुलसचिव **विद्यापीठाचे संचालक/विभाग प्रमुख**
**प्राचार्य संलग्नित महाविद्यालये**

कृपया मागे पाहा

प्रपत्र 'ड'

## महाविद्यालयांनी/विद्यापीठीय विभागांनी राज्य पुरस्कारासाठी शिफारस केलेल्या शिक्षकांचा तपशिल दर्शविणारे विवरणपत्र

| शिक्षकाचे संपुर्ण नाव | पदनाम | अर्हता | वय व नेमणुक दिनांक | एकूण सेवा | शिक्षकांच्या महत्वाच्या कामाचे संक्षिप्त वर्गिकरण (२० ओळी) | विद्यापीठ | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

ठिकाण :

दिनांक :

स्वाक्षरी
कुलसचिव शि.स. पुणे /विद्यापीठाचे संचालक/विभाग प्रमुख
प्राचार्य संलग्नित महाविद्यालये

१.
२.
३.
४.
५.
६.
७.
८.

## प्रपत्र 'इ'

### महाविद्यालयाच्या/विद्यापीठाच्या शिफारस केलेल्या शिक्षकांचा थोडक्यात परिचय

| शिक्षकांचे नांव व पदनाम | पत्ता (दूरध्वनी कमांक) | थोडक्यात माहिती |
|---|---|---|
| | | |

ठिकाण :

दिनांक :

**स्वाक्षरी**
कुलसचिव शि.स. पुणे /विद्यापीठाचे संचालक/विभाग प्रमुख
प्राचार्य संलग्नित महाविद्यालये

कृपया मागे पाहा

प्रपत्र 'फ'

(राज्य शिक्षक पुरस्काराकरिता संक्षिप्त माहिती)

१) नाव, पत्ता व दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक :

२) जन्म दिनांक :

३) विद्यापीठ/महाविद्यालयाचे नाव :

४) शैक्षणिक अर्हता :

५) संक्षिप्त माहिती :
(संबंधित शिक्षकाच्या कार्याविषयीची संक्षिप्त माहिती सलग १० ते १५ ओळीत, पासपोर्ट आकाराचे दोन कृष्णधवल छायाचित्रांसह द्यावी)

***********************